पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष २ रे • अंक : १५ • डिसेंबर, २००८ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## ध्वजदिन निधी संकलन

युध्दात प्रत्यक्ष भाग घेवून भारतीय सैनिकांनी अतुलनीय पराक्रम करुन भारतीय नागरिक व सीमांचे संरक्षण केले. त्यामुळे देशाचे सार्वभौमत्व, स्वातंत्र्य आणि शांतता अबाधित ठेवण्यात त्यांनी बहुमोल योगदान केले आहे. युध्दात धारातीर्थी पडलेल्या व अपंग झालेल्या सैनिकांच्या कुटुंबातील वीरमाता, वीरपत्नी वा अन्य कुटुंबियांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे.



पुणे महानगरपालिकेतर्फे ध्वजदिन निधी संकलन दर वर्षी करण्यात येते. पुणे महानगरपालिकेचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी हे आपल्या वेतनातून सदर निधी संकलित करतात. अन्य व्यक्तिंकडून असा निधी संकलित केला जात नाही. त्यामुळे या निधी संकलनास वेगळे वैशिष्ट्य आहे, असे यापूर्वी तत्कालीन मा. जिल्हाधिकारी आणि मा. विभागीय आयुक्त अनुक्रमे मा.श्री. मधुकर कोकाटे व मा. श्री. प्रभाकर करंदीकर यांनी स्पष्ट नमूद केले होते. या वर्षीही मनपातर्फे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करत असताना मनपाच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनीच आपल्या वेतनातून सदर निधी संकलित करुन, जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे सुपूर्त केला आहे.

दिनांक १५/१२/२००८ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे यांचेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन, २००८ च्या कार्यक्रमामध्ये सन २००७ मध्ये पुणे महानगरपालिकेने ध्वजदिन निधी संकलनामध्ये केलेल्या गौरवास्पद कामगिरीबद्दल पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. सदर पुरस्कार मा.डॉ. नितीन करीर, आयुक्त, महसुल विभाग, पुणे यांचे हस्ते पुणे महानगरपालिकेतर्फे मा. श्री. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी स्विकारला. सर्व मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन. कारण त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने सदर पुरस्कार मनपास प्राप्त झाला आहे.

## पुणे मनपा युनियनचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

पुणे मनपा कामगार युनियनचा वर्धापन दिन १० डिसेंबर, २००८ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापनदिनानिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या गंजपेठेतील स्मारकास जेष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांनी पुष्पहार अर्पण करुन युनियनला महात्मा फुले यांचे काही अखंड सांगितले. त्यानंतर या मिरवणुकीला सुरुवात झाली. मिरवणुक मंडई येथे आल्यानंतर तेथील लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास श्रीमती मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.



ओला-सुका कचरा वेगळा करा, शेजारच्या गावांना कचऱ्याचा त्रास घेता येईना त्यांना श्वास, कचऱ्यातून खत करा, बायोगॅस निर्माण करा, असे फलक कामगारांनी हातात घेवून प्रबोधनपर गाणी गात व घोषणा देत जनजागृतीसाठी मिरवणुक काढण्यात आली.

मुंबईतील दहशतवादी हल्ल्याच्या निशेधार्थ कामगारांनी घोषणा दिल्या. महत्वाच्या चौकात थांबून हल्यात मरण पावलेल्यांना श्रध्दांजली वाहिली. नागरिकांनीही वाहने बंद करुन कामगारांना साथ दिली.मिरवणुकीची सांगता सायंकाळी ५.३० वाजता मनपा हिरवळीवर झाली. या प्रसंगी मा. श्री. प्रवीणसिंह परदेशी, महापालिका आयुक्त उपस्थित होते. मा. आयुक्त यांनी मनपा भवनासमोरील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. आपल्या भाषणात त्यांनी युनियनने ६५ वर्षाच्या काळात कामगारांच्या मागण्यांबाबत ठाम राहून प्रशासनाबरोबरही योग्य समन्वय राखला, या शब्दात युनियनची प्रशंसा केली. सभेचे अध्यक्ष कॉ डी.एस.देशपांडे हे होते. श्रीमती मुक्ता मनोहर, सरचिटणीस यांनी कामगारांच्या मागण्या स्पष्ट केल्या.

सदर कार्यक्रमास मा.डॉ. सिध्दार्थ धेंडे, सभासद, मा.अविनाश साळवे, सभासद, मा.निलेश निकम, सभासद, मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार), मा.ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त, श्री. उत्तम डामदिमे, ॲम्युनेशन फॅक्टरी युनियनचे प्रतिनिधी, श्री. सुनिल कदम, श्री. नरेंद्र वाघ, श्री. पांडुरंग सावंत उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रकाश चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन कॉ. प्रकाश जाधव यांनी केले.

## व्हेईकल डेपोमध्ये नेत्रदान कार्यक्रम

पुणे महानगरपालिका व्हेईकल डेपोमध्ये दि.१२ व १३ डिसेंबर, ०८ रोजी दत्त जयंती सोहळा उत्साहात संपन्न झाला. दत्त जयंतीनिमित्त धार्मिक विधी, दत्त जन्म सोहळा, महाप्रसाद, भजन, किर्तन, इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. व्हेईकल डेपोमध्ये १४ वर्षांपासून अशा प्रकारे सामुदायिक दत्त जयंती सोहळा साजरा केला जातो. श्री.विठ्ठल जगदाळे व श्री.अशोक धुमाळ या धडाडीच्या चळवळ्या सेवकांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने या वर्षी मरणोत्तर नेत्रदानाचा एक आगळा वेगळा कार्यक्रम हाती घेतला. सदर कार्यक्रमास मा. पोळ, नगर उप अभियंता व सर्व कामगारांनी उत्कृष्ट सहकार्य केले. व्हेईकल डेपोमधील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी या प्रसंगी नेत्रदानाचा संकल्प केला. नेत्रदान सर्वश्रेष्ठ दान आहे, या हेतूने सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजासाठी काहीतरी करण्याच्या भावनेतून अधिकारी/कर्मचाऱ्यांनी नेत्रदानाचा संकल्प पार पाडला.



या प्रसंगी मरणोत्तर नेत्रदान करणाऱ्यांना प्रशस्तीपत्रक व ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमास मा.कोंढरे, उप आयुक्त, मा. सुरेश जगताप, उप आयुक्त, मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार), श्री. आबनावे, मा. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन, श्री. प्रकाश हुरकुडली, श्री. प्रकाश चव्हाण, तसेच राष्ट्रीय नेत्रचिकित्सा संस्थेचे श्री. प्रितम वाघमारे या मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व कामगारांच्या या उत्स्फूर्त उपक्रमाचे कौतुक केले.

श्री. विठ्ठल जगदाळे व श्री. दिलीप कांबळे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दिलीप बडदे यांनी तर आभारप्रदर्शन मा. श्री. पोळ, नगर उप अभियंता (व्हेईकल डेपो) यांनी केले.

## वाहतुक नियोजन विभागास उत्कृष्ट बहुउद्देशिय एकात्मिक प्रकल्पाचे पारितोषिक

वाहतुक नियोजन विभागामार्फत शहरात होणारी वाहतुक कोंडी टाळण्यासाठी मल्टिमोड इंटिग्रेटेड प्रोजेक्ट कार्यान्वित करण्यात आला होता. त्या अंतर्गत पुणे रेल्वे स्टेशनसमोरील चौकात पादचारी भुयारी मार्गाचे बांधकाम करण्यात आले. प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे नुकत्याच भरविण्यात आलेल्या प्रदर्शनात याबाबतची माहिती देण्यात आली. सदर प्रदर्शनात पुणे महापालिकेस उत्कृष्ट बहुउद्देशीय एकात्मिक प्रकल्पाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. अतिरिक्त नगर अभियंता (प्रकल्प) श्री. श्रीनिवास बोनाला यांनी केंद्रीय नागरी विकास राज्य मंत्री मा. श्री. अजय माखन यांचे हस्ते पारितोषिक स्विकारले. याबाबत पुणे मनपाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## कुशल मनुष्यबळ

प्रशासकीय यंत्रणेमध्ये काम करीत असताना प्रामुख्याने नगरपालिका/महानगरपालिकेसारख्या स्थानिक स्वायत्त संस्थांमार्फत नागरिकांना नागरी सुविधा वेळेवर व उत्तम दर्जाच्या देणे ही अत्यंत अवघड व तारेवरील कसरतीप्रमाणे कामगिरी आहे. ही जबाबदारी पार पाडत असताना प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर अधिकारी/कर्मचाऱ्यांना काम करावे लागते. वेळेवर व उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा पुरविण्यासाठी कुशल मनुष्यबळाची नितांत गरज आहे. कुशल मनुष्यबळाशिवाय शहरातील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणे केवळ अशक्यप्राय आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता प्रशासनामध्ये सेवक नियुक्ती करण्यापूर्वी त्या पदाच्या कामाचे स्वरुप विचारात घेवून त्याची कर्तव्यसूची विहित करण्यात यावी. त्या अनुषंगाने त्याची शैक्षणिक पात्रता व अनुभव इत्यादी विहित करुन त्याप्रमाणे पूर्ण कसोटीवर उतरणाऱ्या उमेदवारांची भरती प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. प्राप्त परिस्थितीमध्ये त्या त्या क्षेत्रातील उच्च शिक्षित, तज्ञ व अनुभवी उमेदवारांच्या प्रचलित रिक्त पदांवर नियुक्त्या करणे आणि त्याद्वारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे हे शक्य असेल तरी त्यावर उपलब्ध रिक्त पदांची संख्या, परिणाम करणारे अन्य घटक विचारात घेता काही प्रसंगी गटातील पात्र उमेदवाराअभावी पदे रिक्त ठेवावी लागतात. त्यामुळे कुशल मनुष्यबळ उपलब्धतेवर मर्यादा येते. दुसरे कारण संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आस्थापनेवरील मान्य जागांवर सेवक कार्यरत असतात. रिक्त पदांची संख्या अत्यल्प किंबहुना ५% पेक्षा जास्त असत नाही. त्यामुळे नव्या नियुक्त्यांवर आपोआपच मर्यादा पडतात. अशा परिस्थितीत उपलब्ध मनुष्यबळामधून म्हणजेच आस्थापनेवरील कार्यरत सेवकांमधून कुशल कामगारांना प्रोत्साहन देणे, निमकुशल कामगारांना त्या दर्जाचे प्रशिक्षण देवून, त्यांचे कौशल्य वाढवून त्यांना कुशल करणे आणि अकुशल कामगारांना प्राथमिक वा किमान कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देवून त्यांचे कौशल्य वाढविणे आणि त्याद्वारे त्यांची व अंतिमत: संस्थेची परिणामकारकरित्या कार्यक्षमता वाढविणे असा प्राधान्यक्रम पुढे ठेवून उपक्रम राबविणेत आल्यास अल्प कालावधीमध्ये कुशल मनुष्यबळ काही प्रमाणात उपलब्ध होवू शकेल. उपलब्ध कार्यरत सेवकांना खात्याच्या गरजेप्रमाणे प्रशिक्षण देणे हा उपक्रम राबविताना दैनंदिन कामही करावे लागणार आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता प्राप्त परिस्थितीमध्ये लोकसंख्येत झालेली वाढ, त्या प्रमाणात मुलभूत यंत्रणेत न झालेली सुधारणा व वाढ यामुळे पूर्ण यंत्रणेवर येणारा ताण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनेकविध कारणांमुळे कामात झालेली वाढ, उपलब्ध जुनी व अपूर्ण साधनसामग्री, मुलभूत यंत्रणा व साधनसमाग्री जुनी झाल्यामुळे त्यांची वारंवार करावी लागणारी देखभाल व दुरुस्ती, त्यासाठी लागणारा वेळ व अर्थ, अद्ययावत साधनसामग्री किंवा यंत्र उपलब्ध झाली तरी त्याचे पुरेसे अद्ययावत तंत्रज्ञान माहिती नसणे किंवा त्या अनुषंगाने आवश्यक पूर्व प्रशिक्षण संबंधितांना दिलेले नसते. ही वस्तुस्थिती विचारात घेता त्यामुळे आवश्यकतेपेक्षा जास्त मनुष्यबळ त्या ठिकाणी उपलब्ध करुन द्यावे लागते. परिणामी एका ठिकाणी जास्त मनुष्यबळ लावल्यास दुसरीकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे नुसते जास्त मनुष्यबळ असून चालत नाही. एकूण परिणामकारक अंमलबजावणीसाठी पुरेशा प्रमाणात कुशल मनुष्यबळ प्रत्येक ठिकाणी प्रत्येक वेळी असणे आणि त्या कुशल मनुष्यबळाचा योग्य आणि पर्याप्त उपयोग करुन घेण्याची कार्यवाही करणारी पर्यवेक्षकीय यंत्रणा किंवा अधिकारी तेवढे सक्षम आणि कार्यकुशल असणे आवश्यक आहे. त्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत गुणवत्ता, वेळ आणि अर्थ या ३ मुलभूत घटकांमध्ये काटकसर करुन चालत नाही. अशा काटकसरीला पर्यायही असत नाही. कारण उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा वेळेवर शहरातील नागरिकांना देणे हे मुलभूत कर्तव्य प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेचे आहे. किंबहुना त्यासाठीच त्या स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या यंत्रणेमध्ये काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना निर्भयतेने आणि कार्यकुशलतेने काम करणे शक्य व्हावे असे वातावरणही त्या संबंधित संस्थेमध्ये असणे अपेक्षित आहे. उपलब्ध पर्यवेक्षकीय साधन सामग्री सक्षम आणि सशक्त मुलभूत यंत्रणा कुशल मनुष्यबळ आणि सक्षम कार्यकुशल पर्यवेक्षकीय यंत्रणा याचा संयोग झाल्यास निश्चितच उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा वेळेवर प्रत्येक शहरवासियांना देतील, ही खात्री आहे.

## परिचय अधिकारी/सेवकांचा



**संवादक : अरुण खिलारी**
**कामगार कल्याणाधिकारी**

पुणे मनपामध्ये मुख्य सुरक्षा अधिकारी या पदावर कार्यरत असणारे श्री.ल.मा.कोंढरे यांची बढतीने उप आयुक्त (ज) या पदावर नियुक्ती झाल्याने त्यांनी या पदाचा कार्यभार स्विकारला आहे. त्यांचेकडे सुरक्षा व अग्निशामक दल हे दोन महत्वाचे विभाग देण्यात आले आहेत. श्री. कोंढरे यांचे संपूर्ण सेवाकाळातील कार्य जाणून घेण्याचा हा स्तुत्य प्रयत्न.

श्री.ल.मा.कोंढरे हे मुठा खोऱ्यातील कोंढूर (ता. मुळशी) गावचे. त्यांचे वडिल मुंबई येथे पोलिस दलात वरिष्ठ अधिकारी होते. त्यांचा जन्म मुंबई येथे झाला. वयाच्या आठव्या वर्षी पितृशोक झाला व कोंढरे कुटुंबीय पुण्यात स्थलांतरीत झाले. बालपणी त्यांचे वास्तव्य सदाशिव पेठेतील इंग्लंडच्या क्रिकेट संघाचे प्रतिनिधीत्व केलेले प्रसिध्द क्रिकेटपटु श्री. सदु शिंदे यांच्या वाड्यात होते. श्री. सदु शिंदे यांच्या क्रिकेट साहित्याने खेळताखेळता त्यांचा खेळाकडे कल वाढला. बालपणच्या रम्य आठवणी सांगताना ते याचा आवर्जून व अभिमानाने उल्लेख करतात.

त्यांचे शालेय शिक्षण पुणे येथील न्यु इंग्लिश स्कुल, टिळकरोड येथे तर महाविद्यालयीन शिक्षण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या गरवारे कॉलेज येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण चालू असताना त्यांनी आंतरविद्यापीठीय मुष्टियुध्द स्पर्धेत गरवारे कॉलेजतर्फे भाग घेवून विजेतेपद पटकाविले. शास्त्र शाखेतील पदवीनंतर त्यांनी आयएलएस विधी महाविद्यालय येथून एल.एल.बी.चा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर त्यांनी सदर्न कमांड येथे संरक्षण सेवेत प्रवेश केला. तेथील साडेसात वर्षाच्या सेवेनंतर सन १९८१ साली मनपा सेवेत सुरक्षा अधिकारी या पदावर नियुक्त झाले. सन १९९२ साली महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात नाव प्रसिध्द होवून सिनिअर सुरक्षा अधिकारी या पदावर त्यांना बढती मिळाली. सन २००० मध्ये त्यांना वर्ग १ संवर्गातील मुख्य सुरक्षा अधिकारी या पदावर बढती मिळाली. सुरक्षा विभागाकडील कार्यकालामध्ये मा. कोंढरे यांना मा. जोगिंदर सिंग, चिफ ऑफ सीबीआय, भारत सरकार यांचे हस्ते उत्कृष्ट प्रशासकीय कामगिरीबद्दल प्रशासकीय दक्षतेचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

महापालिकेच्या सुरक्षा विभागात त्यांनी काही मुलभूत बदल घडवून आणले. त्यामध्ये प्रामुख्याने महत्वाच्या जागी काम करणाऱ्या सुरक्षा रक्षकांना अग्निशस्त्र देण्यात आली. (उदा. कोष कार्यालय, भरणा गाड्या, इत्यादी) सॅण्डलऐवजी ॲम्युनिशन शुज, फोरेजऐवजी बॅरेट कॅप, कॉटनऐवजी टेरिकॉटचे गणवेष देण्यास सुरुवात केली. त्यामुळे सुरक्षा यंत्रणेत सुलभता येवून सुरक्षा रक्षकांकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलला. परिणामी सुरक्षा रक्षकांमध्ये उत्साह वाढून जबरदस्त आत्मविश्वास निर्माण झाल्याने कार्यक्षमतेतही वाढ झाली. याशिवाय महत्वाच्या प्रसंगी व वादग्रस्त कारवाईच्या वेळी व्हिडिओ शुटिंग करण्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन स्तुत्य उपक्रम त्यांनीच सुरु केला आहे. ही विशेष नोंद करण्यासारखी बाब आहे. त्यामुळे शासकीय कामकाजातील अडथळे व दबावतंत्राचा उपयोग यांना चांगलाच प्रतिबंध होवून कठीण कारवाईही निर्भयपणे व सुरक्षितरित्या विना अडथळा पार पडू लागल्या, हे त्यांच्या कर्तुत्वाचे यश आहे.

याशिवाय नवनियुक्त सेवकांसाठी त्यांच्या परिविक्षाधीन कालावधीमध्ये त्यांना मुलभूत प्रशिक्षण देणेची योजना त्यांनी सुरु केली आहे. त्यामध्ये कवायत, अग्नि शस्त्र चालविण्याचे प्रात्यक्षिक व क्रमिक शिक्षण देण्यात येते. याचबरोबर बीईजी, एसआरपी या नामांकित संस्थांमार्फत फायर रेंजवर प्रात्यक्षिक प्रशिक्षण या सेवकांना देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

२७ वर्षांच्या अखंड सेवेनंतर नुकतेच ते उप आयुक्त (ज) या पदावर विराजमान झाले आहेत.उप आयुक्त पदाची जबाबदारी स्विकारल्यानंतर अधिक कार्यक्षमतेने व जबाबदारीने अधिक गौरवपूर्ण कामगिरी करुन पुणे महानगरपालिका व पुणेकर नागरिकांची प्रशंसा आणि अपेक्षापूर्ततेस पात्र ठरण्याच्या दृष्टीने सुरक्षा व अग्निशामक दल यामध्ये सांघिक भावनेने अद्ययावत तंत्रज्ञान व साधनसामग्रीसह निर्भयपणे कार्यरत रहाण्याचा ते मनोदय व्यक्त करतात. कर्मचाऱ्यांसाठी ते संदेश देताना ते म्हणतात नेमुन दिलेले काम प्रामाणिकपणे करा, तसे केल्यास कोणासही भिण्याचे कारण नाही, आपली कर्तव्ये वेळेवर, पूर्ण जबाबदारीने, शिस्तीने व त्याग भावनेने केल्यास कर्तव्यपूर्तीचे समाधान ओघाने मिळतेच, त्याचबरोबर त्याचे योग्य वेळी योग्य मुल्यमापन होवून त्याचे श्रेयफलही प्राप्त होते, हा दृढ विश्वास त्यांनी स्वानुभवातून व्यक्त केला. मनपाने आपल्यासाठी काय केले याचा विचार करण्यापेक्षा आपण मनपासाठी काय करतो हे पहाणे महत्वाचे आहे, असे ते वारंवार आपल्या सहकाऱ्यांवर बिंबवित असतात.

## सेवापूर्ती समारंभ संपन्न

महापालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या वर्ग १ ते ४ मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी सेवापूर्ती समारंभ दरमहा प्रशासनातर्फे आयोजित करण्यात येतो. माहे नोव्हेंबर, २००८ मध्ये निवृत्त होणाऱ्या सेवकांसाठी शनिवार, दिनांक २९/११/२००८ रोजी कै. वडके हॉल येथे सेवापूर्ती समारंभ संपन्न झाला. माहे नोव्हेंबर, २००८ मध्ये एकूण २६ सेवक सेवानिवृत्त झाले. यापैकी २० सेवक वयोपरत्वे व ६ सेवक ऐच्छिक सेवानिवृत्त झाले.



या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा. श्री शरद समेळ, नगर सचिव, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते तर मा. श्री. तुकाराम जगताप, अध्यक्ष, पुणे म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन, मा. श्री. सुभाष पुरी, व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम व मा. श्री. वसंतराव गोडबोले, अध्यक्ष, पुणे मनपा सेवानिवृत्त संघ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी प्रास्ताविकपर भाषणात सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना मार्गदर्शन केले. सेवानिवृत्तीनंतर अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेचे सभासद होणेसाठी करावयाची पूर्तता व त्याचे फायदे याबाबत डॉ. पंडित सोनकांबळे, वैद्यकीय अधिकारी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. समेळ यांनी सेवानिवृत्त सेवकांना सदिच्छा देताना मिळालेल्या पैशाची योग्य प्रकारे गुंतवणूक करणेबाबतचे महत्व विषद केले. प्रचलित कार्यपध्दतीनुसार सर्व सेवानिवृत्त सेवकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शॉल व स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री. जयवंत शिंदे, ज्यु.ग्रे.लेखनिक यांनी केले.

## रोटरी क्लब ऑफ पुणेतर्फे मा. विलास कानडे यांचा सत्कार

रोटरी क्लब ऑफ पुना मिडटाउनतर्फे अपार कष्ट, जिद्द, सचोटीने व्यवसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना देण्यात



येणारा व्यवसायिक गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या वर्षी पुणे महानगरपालिका कर आकारणी, कर संकलन प्रमुख मा. श्री. विलास कानडे यांना दिनांक १३ डिसेंबर, २००८ रोजी लोकमान्य सभागृह येथे सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मा. सौ. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे उपस्थित होत्या. मा. श्री. कानडे यांनी महानगरपालिकेत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

पुणे मनपाने २००८-०९ मध्ये केलेली उत्कृष्ट, वैशिष्ट्यपूर्ण व उल्लेखनीय कामगिरी, पुणे महानगरपालिकेच्या करपात्र रकमेत वाढ, अभय योजना, ईमेलद्वारे तक्रारींचे निराकरण, पुणे महानगरपालिकेच्या मिळकतकरात वाढ, मनपाच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने मुंबई महानगरपालिकेप्रमाणे भांडवली मुल्याधारित करपध्दती लागू करणेचा प्रस्ताव व कार्यपध्दती, दर गुरुवारी मिळकतदारांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी टॅक्स अदालतचे आयोजन, इत्यादी विविध संकल्पना यशस्वीपणे राबविण्यात खातेप्रमुख म्हणून मा. श्री. कानडे आणि त्यांचे सहकाऱ्यांनी केलेल्या अथक परिश्रमाप्रित्यर्थ त्यांचा जाहीर सत्कार करुन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## यशवंतराव चव्हाण नाट्यगृह वर्धापनदिन साजरा

पुणे महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचा ८ वा वर्धापनदिन मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर, २००८ रोजी साजरा करण्यात आला. वर्धापनदिनानिमित्त सकाळी १०.३० वाजता कै. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर, पुणे यांचे शुभहस्ते पार पाडण्यात आला.

या प्रसंगी आपली सांस्कृतिक अभिरुची या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. वि.भा.देशपांडे व प्रमुख वक्ते मा. किर्ती शिलेदार, मा. मंगेश तेंडुलकर, मा. स्वाती दैठणकर हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. महाजन यांनी केले व आभार प्रदर्शन मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर यांनी केले. परिसंवादास विविध कलाकार, तंत्रज्ञ तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुपारी १२.३० वाजता कारभारी जरा दमानं (लावणीनृत्य), संध्याकाळी ५.३० वाजता आम्ही कोथरुडकर, कोथरुड कलावंत संगीत रजनी व रात्री ९.३० वाजता आनंदी आनंद (नाटक) या कार्यक्रमाचे विनामूल्य आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे वेळी मा.चंद्रकांत मोकाटे, मा. श्री. नितीन उदास, क्षेत्रीय अधिकारी मा. अमर परदेशी, व्यवस्थापक, सांस्कृतिक केंद्रे, मा. तानाजी उभे, प्रभारी व्यवस्थापक, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, तसेच अन्य कलाकार, तंत्रज्ञ, मनपा सेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे महानगरपालिकेत जागतिक एड्स दिन साजरा

दिनांक १ डिसेंबर, २००८ रोजी जागतिक एड्स दिना निमित्त पुणे शहर एड्स नियंत्रण या संस्थेने पुणे महानगरपालिका भवन येथे एड्सविषयक पोस्टर प्रदर्शन व पथनाट्याचे आयोजन केले होते. मा. श्री. एम.एस.देवणीकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज), पुणे महानगरपालिका यांच्या हस्ते सदर प्रदर्शनाचे व पथनाट्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास मा. डॉ. चांदककर, आरोग्य प्रमुख, मा. डॉ. आर.आर.परदेशी, उप आरोग्य प्रमुख, मा. डॉ. एस.टी.परदेशी, सहाय्यक आरोग्य प्रमुख, मा. डॉ. पाटोळे, मा. डॉ. सातारकर, मा. डॉ. दिलीप परदेशी, सहाय्यक आरोग्य प्रमुख व टी.बी.विभागप्रमुख, डॉ. ठाकूर, डॉ. श्रीमती साबणे, डॉ. राजीव बांबळे, एड्स नोडल ऑफिसर, श्री असंग पाटील, श्री. नामदेव धायगुडे व इतर मनपा अधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटीने तयार केलेल्या जनजागृती साहित्याचे वाटप करण्यात आले. सदर साहित्य माध्यमिक शाळा, महाविद्यालये, झोपडपट्टीमधील आंगणवाडी, दवाखाने व प्रमुख शासकीय कार्यालयांमध्ये लावून त्याद्वारे एड्सविषयक जनजागृती केली जाणार आहे. तसेच, पथनाट्य कलाकारांकडून पुणे शहरातून डिसेंबर अखेरपर्यंत विविध २०० ठिकाणी एड्सवर पथनाट्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

## कै. बा.स.ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालयास बॉम्ब शोधक पथकाकडून प्रशिक्षण

पुणे महानगरपालिकेच्या कै. बा.स.ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालयाकडील सर्व कर्मचाऱ्यांकरिता पुणे पोलिस कार्यालयाकडील बॉम्ब शोधक पथकाकडून कै. ढोलेपाटील माध्यमिक विद्यालय येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. सुनिल अशोक गायकवाड, सहाय्यक पोलिस आयुक्त (लष्कर विभाग), श्री. रणजित घुरे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, श्री. मिलींद पाटील, सहाय्यक पोलिस निरीक्षक व श्री. मारुती पंडित यांनी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले.

सदर प्रशिक्षणामध्ये सार्वजनिक स्वच्छता करीत असताना कचरा कंटेनर, अडगळीच्या जागा, ड्रेनेज चेंबर्स, जिन्यातील दुर्लक्षित जागा, इमारतींच्या टेरेसवरील दुर्लक्षित जागा, इत्यादी ठिकाणी कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी, अनोळखी वस्तु अथवा बॉम्बसदृश्य वस्तू आढळल्यास कोणती काळजी घ्यावी, सहकाऱ्यांना कसे जागृत करावे, वरिष्ठांना कशा प्रकारे माहिती द्यावी, अशा महत्वपूर्ण बाबीसंदर्भात प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यात आली.

या प्रसंगी मा. जीवन सोनवणे, उप आयुक्त, मा. श्रीराम साळवेकर, क्षेत्रीय अधिकारी, डॉ. मिलींद खेडेकर, विभागीय आरोग्य निरीक्षक, श्री. दिलीप जाधव व अन्य अधिकारी/सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चित्तथरारक अनुभव

दिनांक २६/९/०८ रोजी सकाळी ११.४५ वाजता एक फोन आला आणि माझ्या अंगाचा थरकाप उडाला. फोनवर सहकारी श्री. बाजारे रडत रडत सांगत



**श्री. विठ्ठल जगदाळे**

होते. कामगार प्रशिक्षण वर्गाच्या बसला कुलूजवळ भयानक अपघात झाला आहे व तीन ते चार जण मयत झाले असावेत इतर सेवक बसमध्ये जखमी अवस्थेत अडकले आहेत. आम्ही तीन ते चार जण मागच्या खिडकीतून बाहेर आलो आहोत. असे सांगितल्यानंतर मन सुन्न झाले. लगेच मी भानावर आलो. सर्वप्रथम ही घटना मी मा.नंदकिशोर जगताप, कॉ. मुक्ता मनोहर, मा.शिवाजी दौंडकर, डेपोमधील माझे सहकारी श्री. जगदाळे व युनियनचे इतर पदाधिकारी यांना कळविले. काही वेळेतच आम्ही सर्वजण मा. सल्लागार (कामगार) यांचे ऑफिसमध्ये जमलो व सदर अपघाताची फोनवरुन सविस्तर माहिती घेतली. त्यानंतर मा.दांगट साहेब व मा. देवणीकर साहेब यांचे ऑफिसमध्ये जमलो. त्यानंतर मा. आयुक्त, सर्व अधिकारी व कॉ. मुक्ता ताई यांचेमध्ये चर्चा होवून दु.४ वाजताचे विमानाने मा. जगताप साहेब, मा. दौंडकर साहेब, डॉ. सोनकांबळे, श्री. जगदाळे, मी व श्री. मांजरे यांना घटनास्थळी पाठविण्याचे निश्चित झाले. आम्ही सर्वजण आहे त्या परिस्थितीत ताबडतोब विमानाने रात्री ८ वाजता दिल्ली येथे पोहोचलो. तेथून कुलू येथे जाण्याचीा रात्री सोय नसल्याने आम्ही महाराष्ट्र भवन येथे मुक्काम केला. तोपर्यंत फोनवर माहिती घेणे चालूच होते. प्रशिक्षणार्थीपैकी विठ्ठल जगताप, चिंतामण जोशी, अनिल कोळी, अंकुश गरुड हे चा सेवक मृत झाले होते. महाराष्ट्र भवन, दिल्ली येथे आम्ही सर्वजण श्री. जगताप साहेब यांचेशी चर्चा करुन आमचे दोन गट केले. श्री.जगताप साहेब, श्री. दौंडकर साहेब, श्री. मांजरे यांनी सकाळी कुलू येथे जखमींना मदत करण्यासाठी व श्री.जगदाळे, श्री.धुमाळ, डॉ.सोनकांबळे यांनी चंदिगड येथे मृतदेह ताब्यात घेण्यासाठी जाण्याचे ठरले. त्याच दरम्यान श्री.खांदवे (कै.जोशींचे मेहुणे) हे तासाभराने जोशींचे नातेवाईकांसह दिल्ली येथे पोहोचले. कुलू येथे मृतदेह एम्बॉल्मींग करण्याची व्यवस्था नसल्याने ते मृतदेह चंदिगड येथे आणणे गरजेचे होते. मा.सुधादेवी (डेप्युटी कलेक्टर, कुलू) यांना विनंती करुन चार मृतदेह चंदिगड येथे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी, असे श्री.जगताप साहेब यांनी सूचित केले. त्यानंतर रात्री २.३० वाजता आम्ही जोशी यांचे नातेवाईकासह चंदिगडकडे प्रयाण केले. तत्पूर्वी श्री. जगताप साहेब यांनी फोनवरुन कुलू येथे संपर्क साधला. जखमींपैकी दोन सेवक श्री. देवकर व श्री.चरवड यंना चंदिगडच्या हॉस्पिटलमध्ये हलविले होते.

दि. २७/९/०८ रोजी सकाळी ८ वाजता पीजीआय हॉस्पिटल, चंदिगड येथे पोहोचलो. पोहोचल्यानंतर जखमी अवस्थेत असलेल्या सेवकांना सत्वर भेटलो, त्यांची विचारपूस करुन प्रमुख डॉक्टरांसह डॉ .सोनकांबळे व श्री. खांदवे यांनी चर्चा केली. त्यानंतर चार मृतदेह घेवून दोन शववाहिका पीजीआय हॉस्पिटल येथे पोहोचल्या. कागदोपत्री पूर्तता करुन चारही मृतदेह शवागरात नेण्यात आले. सदर ठिकाणी एम्बॉल्मींग करण्याकरिता मनुष्यबळ अपुरे असल्याने तेथील डॉक्टरांना मृतदेह एम्बॉल्मींगसाठी आम्ही स्वत: स्ट्रेचरवरुन नेवून मदत केली. डॉक्टरांनी एम्बॉल्मींगचे साहित्य, मृतदेह विमानाने नेण्याकरिता लागणाऱ्या शवपेट्या, प्लॅस्टिक बॅग व इतर साहित्य सर्व बाहेरुन ताबडतोब खरेदी करुन आणण्यास सांगितले.

चारही मृतदेह एम्बॉल्मींग करुन घेतले व श्री. धुमाळ यांनी चंदिगडमधील फर्निचर दुकानात जावून चार शवपेट्या ताबडतोब बनविण्याचे प्रयत्न केले. परंतु दोन तासात चार शवपेट्या तयार करणे शक्य नसल्याने शेवटी काही दुकानातील कामगार एकत्र करुन दोन शवपेट्या त्वरीत तयार करुन घेतल्या. उरलेल्या दोन शवपेट्या शहरातील एका चर्चमध्ये जावून तयार करुन घेतल्या. तोपर्यंत दुपारचे २ वाजले होते. विमानाची वेळ दुपारी ३ ची होती. तत्पूर्वी विमानतळावर १ तास आधी जाणे गरजेचे होते. तत्काळ आम्ही श्री. खांदवे व त्यांचे नातेवाईक यांना विमानतळावर पुढील व्यवस्था करण्याकरिता पाठविले. वेळ जात होती तसतसे आमच्या काळजाचे ठोके वाढत होते.शवागरात डॉक्टर तसेच श्री. जगदाळे व श्री.धुमाळ यांनी चारही मृतदेह शवपेट्यामध्ये व्यवस्थित पॅकिंग केले. सदर शवपेट्या आम्ही दोघांनी मिळून जवळ जवळ ५०० फुट अंतरावर उचलून आणल्या. तोपर्यंत ३.३० वाजले होते. विमानाची वेळ चुकली होती. अशा परिस्थितीत एक ॲम्ब्युलन्स व एक पोलिस व्हॅनमध्ये चार शवपेट्या घेवून आम्ही विमानतळावर



**श्री. अशोक धुमाळ**

पोहोचलो आणि आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. पूर्ण एक तास संपूर्ण प्रवाशांनी भरलेले विमान विमानतळावर रोखून ठेवले होते.आश्चर्याबरोबरच आमच्या मा.आयुक्त, मा.अधिकारी व पदाधिकाऱ्यांचा अभिमान वाटला. या सर्वांनी मिळून विमानतळ, हॉस्पिटल, पोलिस स्टेशन इत्यादी ठिकाणी सतत संपर्क साधून कोठलीही अडचण येणार नाही याची पूर्ण काळजी घेतली होती. आम्हाला वेळोवेळी मा.सुधादेवी, पी.आय.आशा शर्मा, मा. खेतमाळीस, डॉ सोनकांबळे, श्री. खांदवे व जोशींचे नातेवाईक यांची भरपूर मदत झाली. यानंतर मृतदेह घेवून विमानाने रात्री ८ वाजता मुंबई विमानतळावर पोहोचलो. तेथे पाच शववाहिका घेवून अधिकारी व युनियनचे पदाधिकारी तसेच कामगार सेवक आले होते. सदर मृतदेह घेवून रात्री १२ वाजता आम्ही मनपा भवनात आलो. त्यानंतर आम्ही आमच्या आश्रूंची वाट मोकळी करुन एक कर्तव्य पार पाडल्याचा सुस्कारा सोडल त्यानंतर रात्री सर्व अधिकारी, पदाधिकारी, मनपातील कामगार सेवक यांनी शोकाकूल अवस्थेत मृतांना श्रध्दांजली अर्पण केली. मृतदेह त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले.

कामगारांचे आयुष्य म्हणजे बसमधील दीर्घकाळ प्रवास असतो. या प्रवासात इतर प्रवाशांबरोबर सुखदु:खांची देवाणघेवाण होत असते. काही प्रवाशांचा प्रवास संपतो. काही नवीन प्रवाशी बसमध्ये बसतात. काही जुने प्रवासी प्रवास संपल्याने उतरतात. बस व प्रवासी काही काळानंतर एकमेकांना हळूहळू दिसेनासे होतात. परंतु हे चार प्रवासी दुर्दैवाने मध्येच प्रवास सोडून इतर सर्वांच्या मनाला चटका लावून निघून गेले. त्यांची आठवण आपण कधीही विसरु शकत नाही. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**वृत्तांकन : श्री. अशोक धुमाळ, ऑटो इलेक्ट्रिशियन, व्हे.डेपो**

## संगमवाडी क्षेत्रीय कार्यालयात आरोग्य तपासणी शिबीर

संगमवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडील सफाई सेवकांची दि.२६/१२/०८ रोजी सकाळी ७ ते १२ या वेळेत स्व.राजीव



गांधी रुग्णालय, येरवडा येथे आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन पुणे मनपा व पुणे शहर व जिल्हा वैद्यकीय व्यावसायिक संघटना आणि डॉ. अविनाश गुप्ते यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.या शिबीरामध्ये एकूण ४५० सेवकांची विविध रोगासंबंधीत तज्ञ डॉक्टरांकडून तपासण्या करण्यात आल्या. शिबीरामध्ये सर्व प्रकारे रक्त तपासणी, ई.सी.जी., स्पायरोमेट्री, डोळे तपासून चष्म्या नंबर काढणे आणि तपासणीअंति आहार, व्यायाम व आरोग्याविषयी घ्यावयाची काळजी याबाबत योग्य मार्गदर्शन तज्ञ व अनुभवी डॉक्टर्समार्फत करण्यात आले.कार्यशाळेस डॉ.अविनाश गुप्ते, डॉ.राजेंद्र जगताप, डॉ.विजय वारद तसेच २० डॉक्टर , मा.अविनाश साळवे, मा. सौ. नंदा कांबळे, सदस्य, पुणे मनपा, मा.सौ.सुलभा क्षिरसागर, माजी सदस्य, मा. नंदकिशोर जगताप, मा. मुकुंद भोसले, मा. श्रीमती मुक्ता मनोहर, डॉ.सुनिल आंधळे, डॉ. मिलिंद खेडकर, तसेच विभागीय आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक, सर्व मोकादम व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. सदर उपक्रम अत्यंत उत्तम प्रकारे पार पाडून केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचा संगमवाडी क्षेत्रीय कार्यालयामार्फत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व स्मृतीचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

## आपत्कालीन व्यवस्थापन जनजागृती

केंद्र सरकार आणि पुणे मनपाच्या संयुक्त विद्यमाने पुणे युथ फौंडेशन या संस्थेतर्फे दि.१ व २ डिसें. ०८ रोजी पीएमटी बस स्थानके, शिवाजीनगर रेल्वे स्टेशन, जंगली महाराज रोड, संभाजी गार्डन, फर्ग्युसन कॉलेज गेट, सारसबाग, स्वारगेट, महात्मा गांधी रोड, पुणे रेल्वे स्टेशन या गर्दीच्या ठिकाणी महापूर, भूकंप, बॉम्बस्फोट, वीज कोसळणे, आगीपासून संरक्षण, इ. आपत्कालीन परिस्थितींबाबत कलापथकाद्वारे जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. गायक महादेव जाधव, अरुण शेडगे, रामभाउ साठे, ढोलकीवादक, प्रकाश चित्रे, पेटीवादक यांनी कलापथकाचे आयोजन केले. सौ. यासमिन पठाण यांनी आगीपासून संरक्षणाबाबत स्त्रियांना मार्गदर्शन केले. पुणे मनपा व्हेईकल डेपोकडील मोटार सारथी भरत खंडु ठोंबरे यांनी सदर कलापथकास मदत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इसाक शेख, अध्यक्ष, पुणे युथ फौंडेशन यांनी केले.

**कल्याणवार्ता**
**डिसेंबर, २००८**
**❖ प्रकाशक तथा अध्यक्ष ❖**
**कामगार कल्याण निधी**
**मा. प्रवीणसिंह परदेशी**
आयुक्त, पुणे महापालिका
**❖ संपादक ❖**
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
**❖ कार्यकारी संपादक ❖**
शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
**❖ सहाय्यक ❖**
सौ. ज्योती अ.भोसले
**❖ मुद्रक ❖**
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
**❖ प्रकाशन स्थळ ❖**
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी
प्रकाशक, संपादक, कार्यकारी
संपादक व पुणे महापालिका
सहमत असतीलच असे नाही.
**❖ संपर्क ❖**
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/
१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap
@punecorporation.org
**फक्त खाजगी वितरणासाठी**